# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शिरोळी एम.आई.डी.सी.
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0232 **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**13/08/2024 21:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
      **Time Period (कालावधी):**
      **Date From (दिनांक पासून):** 10/08/2024
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/08/2024
      **Time From (वेळेपासून):** 20:51 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 13:32 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 13/08/2024 **Time (वेळ):** 20:45 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 017
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/08/2024 20:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   दक्षिण, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** नागांव,कोल्हापुर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रविंद्र रघुनाथ जाधव

(b) **Guardian's Name (पालक चे नाव) :** रघुनाथ जाधव

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा अंबपवाडी,कोल्हापुर,शिरोळी एम.आई.डी.सी.,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा अंबपवाडी,कोल्हापुर,शिरोळी एम.आई.डी.सी.,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8698278558

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | तुषार महादेव सोनवणे | | | 1. बामणोली,सांगली,मिरज,सांगली ग्रमीण,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अमर विक्रम चौगुले | | | 1. राछशिवाजी तालीम जवळ,, कोल्हापुर,हातकणंगले, हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4000रुपये त्यामध्ये 500रुपये दराच्या आठ चलनी नोटा | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

4,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 13/08/2024

मी श्री रविंद्र रघुनाथ जाधव, वय 29 वर्षे,व्यवसाय -खाजगी नोकरी, रा. अंबपवाडी,ता.हातकणंगले, जि. कोल्हापूर मो.नं.8698278558 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 10/04/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना समक्ष भेटुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितली की, माझी अंबपवाडी येथे वडीलार्जीत मालमत्ता आहे. सदर मालत्तेमधील मिळकत नंबर 1215,1217,1219 मधील प्रॉपर्टी वरती माझे वडील श्री रघुनाथ शंकर जाधव, मारुती शंकर जाधव, पोपट शंकर जाधव हे चलुते व इत्यादींची नावे वारसाप्रमाणे नोंद होणेसाठी आम्ही रितसर सिटी सर्व्हे ऑफीस टोप येथे कागदपत्रे दिलेली होती. त्याप्रमाणे सदर मिळकतीवर आमच्या वारस नोंदी झालेल्या होत्या. त्यानंतर आमची अंबपवाडी येथील मिळकत नंबर 1276,1277 मधील प्रॉपर्टी वरती आमची वारसांची नावे नोंद करणेबाबतची माहिती घेणेकरीता मी दिनांक 02/04/2024 रोजी सिटी सर्व्हे ऑफीस टोप येथे गेलो होतो. त्यावेळी तेथे सोनवणे साहेब यांना भेटलो असता त्यांनी मला त्यांचे कार्यालयातील खाजगी उमेदवार अमर चौगुले यांना भेटण्यास सांगितले. अमर चौगुले यांनी मला कार्यालयाच्या बाहेर नेवून तुमचे यापुर्वी प्रॉपर्टीचे कामावरती वारस नोंदीचे काम करून दिले म्हणुन तसेच नविन प्रॉपर्टीचे कामामध्ये वारस नोंद करून देतो त्यासाठी दोन्ही कामाचे मिळुन 10,000/- रूपये दयावे लागतील नाहीतर तुमचे नविन प्रापर्टीचे वारसा नोंदीचे काम करण्यास अडचण होईल असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना एक आठवडाभरात पैशाची जुळणा करून भेटतो असे सांगितले. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी दि.10/04/2024 रोजी सायंकाळी 06.00 वा चे सुमारास चौगुले यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. त्यानंतर नाळे साहेबांनी लागलीच दोन पंचाना बोलावुन घेतले. त्यानंतर आमची दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून दिली. त्यावेळी मी त्यांना वरील तक्रार सांगितली. मी नाळे साहेबांना चौगुले हे मला अंबपवाडी येथे घरी भेटण्यास येणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी नाळे साहेबांनी मला कासारवाडी, ता. हातकणंगले येथुन पडताळणी कारवाई करणार असल्याचे सांगीतले. मी कासारवाडी येथे जावुन थांबलो. काहीवेळाने नाळे साहेब, पंच, स्टाफ असे तेथे आले. नाळे साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन खाजगी उमेदवार अमर चौगुले यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. मी माझे वरील मोबाईल वरून चौगुले यांचे मोबाईल नंबर 9373353031 वर फोन केला त्यावेळी चौगले यांनी ते हातकणंगले येथे गेले असुन मला सांगली फाटा येथे तासाभराने भेटुया असे सांगितले. त्यानंतर आम्ही सांगली फाटा येथे आलो. काहीवेळाने चौगले यांना फोन लावला असता त्यांनी ते विस मिनीटात सांगली फाटा येथे पोहचतो असे म्हणाले. नाळे साहेबांनी चौगले यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझ्याकडे दिला. मला व पंच नं.1 यांना चौगुले यांना भेटणेकरीता पाठविले. थोडयावेळाने अमर चौगुले तेथे आले मी चौगुले यांना भेटलो त्यावेळी आमचेत प्रॉपर्टीचे वारसा नोंदीचे पहिला करून दिलेल्या कामाचे व नविन वारसा नोंदी करीता देणार असले कामाचे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी चौगुले यांनी दोन कामाचे मिळुन माझेकडे एकुण आठ हजार रूपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना काहीतरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी त्यांनी एक हजार कमी करा असे म्हणुन माझेकडे तडजोडीअंती 7000/- रूपये मागणी केली. त्यानंतर आमचेत कामाचे

अनुषंगाने बोलणे झाले. चौगले हे निघुन गेलेनंतर मी, पंच नं.01 परत येवुन साहेबांना हकीकत सांगितली. त्यानंतर सोनवणे यांचे लाच मागणीची पडताळणी करण्याचे ठरविले परंतु सोनवणे यांचे कार्यालयाचे वेळ संपलेने त्यांची भेट होवु शकणार नसलेने चालु कारवाई स्थगित केली.

दिनांक 22/04/2024 रोजी मी नाळे साहेबांना त्यांचे कार्यालयात भेटलो व त्यांना आज सोनवणे यांना भेटणेस जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी पंचाना तसेच त्यांचा स्टाफ यांना बोलावुन घेतले. त्यावेळी नाळे साहेबांनी सिटी सर्व्हे कार्यालय टोप येथील सोनवणे साहेब यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करणेकरीता सुचना देवुन माझेकडे व्हाईस रॅकार्ड चालु करून देवुन मला व पंच 01 यांना सोनवणे यांची भेट घेणेकरीता पाठविले. मी कार्यालयात जावुन सोनवणे साहेब यांना भेटलो. त्यावेळी आमचेत आमचे प्रॉपर्टी वारस नोंदीचे पुर्वी केलेल्या कामाचे व नविन कामाचे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी सोनवणे यांनी मला प्रॉपर्टीचे नविन कामाची कागदपत्रे चार वाजेपर्यंत जमा करणेस सांगितले तसेच सदर प्रॉपर्टी वरती वारसांची नावे लावणेसाठी मला काय आसल ते खुशीने दयायच आणि विषय संपवुन टाकायचा आणि मोकळं व्हायच असे बोलुन माझेकडे लाचेची मागणी केली त्यावेळी मी त्यांना कागदपत्र घेवुन परत येतो असे म्हणुन मी व पंच साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना हकीकत सांगितली. त्यावेळी नाळे साहेबांनी श्री सोनवणे यांनी माझेकडे नेमके किती पैसे मागणी केली याबाबत त्यांची आणखीन पडताळणी करणे आवश्यक असलेने श्री सोनवणे माझेकडे किती रक्कम रूपये मागणी करतात या करता त्यांची पुन्हा पडताळणी करण्याचे सर्वमते ठरविले. त्याप्रमाणे पुन्हा नाळे साहेबांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने पुन्हा सुचना देवुन मला व पंच नं. 1 यांना पितळी गणपती मंदिर परिसरातुन सोनवणे साहेबांना भेटण्यास पाठविले. मी कार्यालयात जावुन सोनवणे यांना भेटलो. त्यावेळी आमचेत आमचे प्रॉपर्टी वारस नोंदीचे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी सोनवणे यांनी मला प्रॉपर्टीचे कामाबाबत आवश्यक असलेली कोणती कागदपत्रे लागतील याबाबत सांगितले. त्यावेळी मी पहिले प्रॉपर्टी काम करून दिले व दुसरे प्रॉपर्टीचे काम करून देणेसाठी दोन्ही कामाचे मिळुन चौगुले यांनी पाच हजार रूपये होणार म्हणुन काय कमी जास्त काय करताय का बघा जरा, काय आसल ते फायनल करतो असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे काम झाल्यावर सांगितल ना मी आता असे म्हणाले. त्यावेळी मी खर किती सांगा की असे म्हणालो त्यावेळी सोनवणे दे तुझ्या हिसाबान तेला काय होतय असे म्हणाले त्यावेळी मी चार हजार असे म्हणालो त्यावेळी सोनवणे हं.. तुझ्या हिसाबान दे, सगळे खुश ता सगळेच खुश असे म्हणाले त्यावेळी मी खर हे एका कामाचे का दुस-या कामाचे असे म्हणालो त्यावेळी सोनवणे हे दोन्हीही दयायचे हाईत ना करून असे म्हणाले. मी त्यांना ते झालाय की काम, पहिल्या कामाचे असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे आसु दे दोन्हीचे दे असे म्हणाले. त्यावेळी मी अर्धा तासात येतो असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे ऑफीसमधुन निघुन जाणार असलेचे समजले. त्यानंतर मी व पंच नं.01 साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना हकीकत सांगितली. सोनवणे साहेब कार्यालयातुन जाणार असलेने चालु कारवाई स्थगित केली.

त्यानंतर माझे नोकरीचे कामाचे व्यापामुळे मला सिटी सर्व्हे टोप येथे जाता आले नाही दरम्यान मला सोनवणे अगर चौगुले यांचा फोन आला नाही. तसेच मिळकत नंबर 1276,1277 मधील प्रॉपर्टी वरती आमची वारसांची नावे नोंद करण्यासाठी लागणारे कागदपत्रे सिटी सर्व्हे ऑफीस टोप येथे दिनांक 22/05/2024 रोजी माझे वडीलांनी जमा केली. दरम्यानचे काळात मला अॅन्टी करप्शन ब्युरोचे साळुंके साहेब यांचा फोन आला त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, नाळे साहेब यांची बदली झाली असुन त्यांचा कार्यभार त्यांचेकडे आला असल्याचे सांगुन सोनवणे अगर चौगुले यांनी माझेशी संपर्क साधल्यास त्यांना कळविणेबाबत सांगितले होते.

दिनांक 12/08/2024 रोजी रात्री 09.30 वा चे सुमारास अमर चौगुले हे माझे घरी येवुन त्यांनी मला प्रॉपर्टी कार्डचे काम त्यांनी व सोनवणे साहेबांनी केले असुन ठरलेप्रमाणे कामाचे 4,000/- रूपये दया असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना आता माझेकडे पैशाची जुळणा नाही जुळणा करून उदया देतो असे त्यांना म्हणालो. त्यावेळी त्यांनी मला ते उदया नागाव येथे आहे तेथे आलेनंतर फोन करा असे म्हणाले. त्यानंतर मी लागलीच सदरबाबत साळुंके साहेबांना सांगितले. त्यावेळी त्यांनी मला ते दिनांक 13/08/2024 रोजी ते पंचासह ते नागाव फाटयाजवळ सकाळी येत असल्याचे सांगितले.

त्यानंतर आज दिनांक 13/08/2024 रोजी मी साळुंके साहेब एकमेकांचे संपर्कात होतो. त्यानंतर आज रोजी 12.13 वाजता माझी साळुंके साहेब यांचेशी भेट झाली त्यानंतर त्यांनी पंच व स्टाफ यांचेशी भेट घालुन दिली. त्यानंतर साळुंके साहेबांनी सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अॅन्थ्रासिन लावलेले 4,000/- रूपये माझे शर्टचे डावे बाजुच्या खिशात ठेवले त्यानंतर साळुंके साहेबांचे सुचनेवरून मी चौगुले यांना माझे वरील नमुद मोबाईल नंबर वरून त्यांचे मोबाईल नंबर 9373353031 वरती दोन वेळा फोन लावला परंतु त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर काहीवेळाने चौगुले यांचा मला फोन आला त्यावेळी त्यांनी मला ते व सोनवणे साहेब नागाव गावात मोजणीसाठी आले असुन त्यांनी मला नागाव मधील खणाईदेवी मंदिराजवळ बोलविले.

त्यावेळी मी त्यांना ठिक आहे असे म्हणालो. त्यानंतर साळुंके साहेबांनी रेकॉर्डर सुरू करून ते माझेकडे दिले त्यावेळी मी व पंच नं.1 असे माझे मोटरसायकलने निघालो. माझे पाठोपाठ साळं◌ुके साहेब, सापळा पथक, पंच नं.2 आले व खणाईदेवी मंदिर नागाव येथील परिसरात सापळा लावुन थांबले. मी तेथुन चौगुले यांना फोन केला असता ते मंदिरासमोर आले. त्यावेळी चौगुले यांनी मला साहेब मला म्हणलत घेवुन ये जा... असे म्हणाले. तेथुन आम्ही सोनवणे साहेब आहे त्या ठिकाणी गेलो त्यावेळी माझेत, सोनवणे साहेब व अमर चौगुले यांचेत कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी मी चार हाईत मोजुन घ्या... असे म्हणालो. त्यावेळी सोनवणे दया दया काय आडचण नाही असे म्हणाले त्यावेळी मी घ्या की तुम्ही काय येवढा विषय नाही घ्या असे म्हणुन सोनवणे साहेब यांचे समोर लाच रक्कम धरली असता त्यांनी ते 4000/- रूपये घेवुन त्यांचे शर्टचे खिशात ठेवले. त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने बोलणे चालु असताना मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता साळुंके साहेब आणि त्यांचा स्टाफ तेथे आला व त्यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह सोनवणे साहेब यांना तसेच अमर चौगुले यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही शिरोली एकआयडीसी पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली.

तरी अंबपवाडी, ता. हातकणंगले येथील मिळकत क्रमांक 1215,1217,1219 वरती वारस नोंदी लावुन दिल्या तसेच मिळकत क्रमांक 1276,1277 वरती वारस नोंदी लावुन देणेकरीता सिटी सर्व्हे ऑफीस टोप मधील खाजगी उमेदवार अमर चौगुले यांनी सोनवणे साहेबांकरीता माझेकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती अप्रमाणिकपणे 7,000/- रूपये लाचेची मागणी केली तसेच सिटी सर्व्हे ऑफीस टोप श्री सोनवणे साहेब यांनी खाजगी उमेदवार अमर चौगुले यांनी माझेकडे मागणी केलेल्या 7,000/- रूपयाचे लाच मागणीस दुजारा देवुन माझेकडे मिळकत क्रमांक 1215,1217,1219 वरती वारस नोंदी लावुन दिल्या तसेच मिळकत क्रमांक 1276,1277 वरती वारस नोंदी लावुन देणेकरीता म्हणुन तडजोडीअंती अप्रमाणिकपणे 4,000/- रूपयांची मागणी करून माझ्याकडुन सोनवणे साहेब यांनी बेकायदेशीरपणे 4,0,00/- रूपये लाच स्विकारताना त्यांना तसेच अमर चौगुले यांना अ◌ॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने त्यांना रंगेहाथ पकडल्याने माझी 1) तुषार महादेव सोनवणे, पद - परिरक्षण भुमापक नगर भुमापन कार्यालय सज्जा टोप, ता हातकणंगले रा.बामणोली, ता.मिरज, जि. सांगली, मुळ रा. आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली, 2) अमर विक्रम चौगुले, खाजगी इसम, रा. शिवाजी तालीमजवळ, हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्य

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Vitthal Hanmantrao ghogre
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 15101000402VH
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

MIDC पोलीस ठाणे

**Name** (नाव): Pankaj Shridhar Giri
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 12305001669PSGM800